**उलटतपास – श्री. एस. बी. मोहिते वकील.**

**१४**. माझे बी. ई. मेकॅनिकल चे शिक्षण झाले आहे. माझ्या नावे पावणेतीन एकर शेती आहे. मी सध्या करत असलेल्या व्यवसायाचे प्रशिक्षण घेतलेले आहे. आम्हाला त्यामध्ये उत्पादनासह विक्री पर्यंतचे संपुर्ण प्रशिक्षण देण्यात आले आहे. मला त्याबाबतचे प्रमाणपत्र मिळालेले आहे. मी ते आवश्यकता भासल्यास न्यायालयात हजर करु शकतो. मी २०१६–१७ सालापासून सदर व्यवसाय करत आहे. मी आजरा, चंदगड व कोकण भागातून माझ्या मालाची खरेदी करतो.

**१५**. मला बँकेचे व्यवहार चांगल्या पध्दतीने समजतात. माझा व्यवसाय खेडेगावात आहे. माझ्याकडे साधारणपणे ८ ते १० मजूर काम करतात. त्यांची प्रत्येकाची कामे वेगवेगळी आहेत. त्यातील काही कटींग विभागात, काही प्रोसेसिंग व गर सोलण्याच्या विभागात काम करतात. मी मालाचे वजन करण्याचे काम करतो. मी त्यासाठी ओनिडा कंपनीचा वजनकाटा वापरतो. मी माझ्या युनिट मधला डेल कंपनीचा संगणक स्वतः हाताळतो. माझ्या व्यवसायाची सर्व बिले कॅनन कंपनीच्या प्रिंटरद्वारे तयार केली जातात. मी सर्व कामगारांवर देखरेख करण्यासाठी सुपरवायझर ठेवलेला नाही.

**१६**. मी साधारणपणे एका वर्षामध्ये पावणेदोन कोटी रकमेच्या आसपास उलाढाल करतो. मी माझ्या कारखान्यामध्ये सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसवलेले आहेत. मी करत असलेल्या व्यवसायाची कागदपत्रे तक्रारी सोबत दाखल केलेली नाहीत.

**(उलट तपासा दरम्यान साक्षीदाराची तब्येत खराब झाल्यामुळे उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.)**

**उलटतपास अपुर्ण.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ०२.०७.२०२६.

(आर. पी. थोरे)

आजरा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.